# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 419/2023 दिनांक : 03.11.2023

## 1)मो. सा. चोरी :–

**1)नायगांव :–** दिनांक 01.11.2023 रोजी चे 22.00 ते दि. 02.11.2023 चे 04.00 चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरा समोर मौ. गडगा ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची सिबी शाईन कंपनीची मो. सा. क्रमांक एमएच–26/जीजे–9932 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी विरभद्र निळकंटराव देवणे, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. गडगा ता. नायगांव ह. मु. सहयोगनगर नायगांव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरन 171/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/349 सांगवीकर, मो. क्रं. 7875643333** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 28.10.2023 रोजी चे रात्री 07.00 ते 08.00 चे दरम्यान, **पोस्ट ऑफिसचे बाजुस देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पलेंडर प्लस कंपनीची मो. सा. क्रमांक टीएस–17/जी–8099 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर पि. प्रकाश वाघमोडे, वय 28 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. हांडे केलुर ता. मदनुर जि. कामारेडडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 466/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री मिरदोडे, मो. क्रं. 9049319591** हे करीत आहेत.

**3)इतवारा :–** दिनांक 26.10.2023 रोजी चे 12.30 ते दि. 27.10.2023 चे 08.30 चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर मन्यारगल्ली धनगर टेकडी नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा युनिकॉर्न कंपनीची मो. सा. क्रमांक एमएच–26/एझेड–9649 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अब्दुल वहाब पि. अब्दुल वाहेद, वय 32 वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक रा. मन्यार गल्ली धनगर टेकडी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 341/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2201 शकील, मो. क्रं. 9881725338** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**1)कुंटूर :–** दिनांक 01.11.2023 रोजी, चे 12.00 ते दि. 02.11.2023 चे 22.27 वा. चे दरम्यान, **मौ. अंतरगाव शेत शिवार कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व पत्नीचे नावे असलेले मौ. अंतरगाव शिवारातील सोयाबीणचे कापणी करून रास करून ठेवलेले 16 क्विंटल सोयाबीन किंमती 80,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी विठ्ठल मधुकरराव लाभशेटवार, वय 62 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. शिवाजी चौक नायगांव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 209/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पोले, मो. क्रं. 9763097222** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 02.11.2023 रोजी, चे 16.00 वा. चे सुमारास, **डॉक्टर लेन बेंगलोर बेकरी वजिराबाद नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई ही नाश्ता करण्यासाठी वजिराबाद डॉक्टर लेन कॉर्नर येथील बेंगलोर बेकरी येथे गेले असता फिर्यादी यांच्या कपडयाच्या पिशवीमधील लेझर पर्स ज्यामध्ये ठेवलेले नगदी 35,000/–रूपये व जुने कानातील सोन्याचे फुल अर्धा ग्राम किंमती 3500/–रू असा एकुण 38,500/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी लक्ष्मीबाई गणपतराव वळंके, वय 47 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. विजयनगर भावसार चौक ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 480/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/11 सोनटक्के, मो. क्रं. 8805007511** हे करीत आहेत.

## 3)शासकीय कामात अडथळा :–

**किनवट :–** दिनांक 02.11.2023 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **गटविकास अधिकारी यांच्या दालनात पंचायत समिती कार्यालय रेल्वे स्टेशन जवळ किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी ग्रामसेवक महिलेस यातील नमुद आरोपीने मागील कामाच्या बिलाच्या मंजुरीच्या कारणावरून अरेरावीच्या भाषेत बोलुन अंगावर खुर्ची फेकुन मारून सरकारी कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी सुशीला रावसाहेब पिंपळे, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी ग्रामसेवक ग्रा. पं. कार्यालय निराळा रा. ह. मु. एसव्हीएम कॉलनी किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 257/2023 कलम 353, 336 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/772 पाटोदे, मो.क्र. 9309737394** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 30.10.2023 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **युवा मिलट्री अकॅडमी समोर काकांडी ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रकाश लक्ष्मण पवार, वय 38 वर्षे, व्यवसाय खा. नौकरी रा. काकांडी ता. जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील क्रुझर जिप क्रमांक एमएच–13/सीएस–5423 च्या चालकाने त्याचे ताब्यातील जिप हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी प्रणित प्रकाश पवार, वय 36 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. काकांडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 784/2023 कलम 279, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मटवाड, मो.क्र. 9922778115** हे करीत आहेत.

## 5)पळवुन नेले :–

**भोकर :–** दिनांक 29.10.2023 रोजी चे 07.00 वा. चे सुमारास, **नंदी नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **लहान भाऊ नामे करण रामा नकलवाड, वय 13 वर्षे, रा. नंदीनगर भोकर ता. भोकर जि. नांदेड** हा सकाळी उठुन घरातुन संडासला म्हणुन निघुन गेला तो परत आला नाही म्हणुन त्याचा परिसरात नातेवाईकाकडे शोध घेतला असता मिळुन आला नाही त्यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी परमेश्वर रामा नकलवाड, वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. नंदीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 384/2023 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/दिगांबर पाटील, मो.क्रं. 9850550670** हे करीत आहेत.

## 6)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**किनवट :–**दिनांक 02.11.2023 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **जिजामाता चौक किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून विना परवाना बेकायदेशिरित्या आपले ताब्यातील टेम्पो वाहन क्रमांक एमएच–29/एटी–1069 किंमती 1,50,000/–रू च्या मध्ये दोन बैल व दोन गाय किंमती 1,10,000/–रूपयाचे जनावरांना क्रुरतेने बांधुन निर्दयतेने कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3209, सदाशिव माणिकराव अनंतवार, ने. पोस्टे किनवट** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 258/2023 कलम 11(1)(डी) 11(1)(एम), 11(1)(एफ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम 1960 सह कलम 5(1), 5(अ)(अ)(2)9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 पाटोदे, मो. नं. 9309737394** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 02.11.2023 रोजीचे 19.45 वा. चे सुमारास, **स्मशानभुमी सिडको नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात नकली पिस्टल व खंजरसह ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/492 संताष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 786/2023 कलम 6/25, 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नरवटे, मो.क्र. 8149863325** हे करीत आहेत.

## 8)विषारी औषध पिऊन आत्महत्या :–

**लोहा :–**दिनांक 31.10.2023 रोजी चे 05.00 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे,** यातील **मयत नामे संतोष बालाजी ताटे, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. पोखर भोसी ता. लोहा जि. नांदेड,** यांनी सततचे नापीकीला व बँकेचे कर्ज कसे फेडावे या तणावातुन कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार दशरथ बालाजी ताटे, वय 29 वर्षे, व्यवसाय शेती रा. पोखर भोसी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे लोहा** आ. मृ. **24/2023** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नाईक, मो.नं. 9370842945** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड